**भोर येथील दुसरे सह.दिवाणी न्यायाधीश, ता. भोर, जि. पुणे यांचे न्यायालयात**

**नियमित दिवाणी दावा क. १५८/२०१२**

रामु भागु पारठे वैगरे . . . . . वादी

विरुध्द

नथु मारुती पारठे व इतर . . . . प्रतिवादी

## निशाणी क्र.०५ वरील आदेश

सदरचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम ३९ नियम १ व २ अन्वये तात्पुरती मनाई हुकुम मिळणेकरीता दाखल करण्यात आला आहे.

## अर्जातील कथने थोडक्यात असे की:—

**२.** **मिळकतीचे वर्णन:** कसबे निगुडघर ता.भोर, जि.पुणे येथील मिळकत याचा गट नं. ३०८ याचे एकूण क्षेत्र ०१ हे. ६२ आर यासी आकार रु १.९९ पैसे (सदर मिळकत ही दाव्यासोबत असलेल्या परिशिष्टामध्ये नमुद केली असून यापुढे सोईकरीता **''दावा मिळकत''** असे संबोधण्यात येईल)

**३.** वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी नंबर १ हा वादीचा सख्खा चुलत पुतण्या आहे. तसेच प्रतिवादी नंबर ४ ही वादीची सख्खी चुलत पुतणी आहे. दाव्यातील परिशिष्ठात दर्शविलेली जमीन ही वादी व प्रतिवादी नंबर १ व ८ यांचे एकत्र कुटुंबाची जमीन आहे. तिचे अद्याप सरसनिरसमानाने वाटप झालेले नाही असे असताना प्रतिवादी नंबर १ याने बेकायदेशीरपणे परिशिष्ठात दर्शवलेली दावा जमीन ही प्रतिवादी नंबर २ याला ता. ११/१२/२००९ रोजी बेकायदेशीरपणे विकत दिलेली आहे. त्यासाठी वादी नंबर १ ते ३ यांनी प्रतिवादी नंबर १,२,८ याचेवर मे. कोर्टात दिवाणी दावा दावा नंबर ७२/१० हा दाखल केलेला असून त्या दाव्यात प्रतिवादी नंबर १,२ यांनी परिशिष्ठात दर्शविलेल्या दावा जमीनेचे हस्तांतरण करु नये. असा आदेश मिळण्याची विनंती केली आहे.

**३.** वादीचे कथन पुढे असे की, दावा मिळकतीत वादीचा अविभक्त हिसा आहे. दावा मिळकतीचे अदयाप सरस निरस मनाने वाटप झालेले नाही. परंतु दि. २५/०३/२०१२ रोजी प्रतिवादी नं ३ ते ७ यांनी दावा मिळकतीत शिरण्याचा

प्रयत्न केला. त्यावेळेस वादींनी त्यांना हरकत केली. त्यानंतर दि.२७/०२/२०१२ रोजी प्रतिवादी नं.३ ते ७ यांनी दावा मिळकतीत शिरण्याचा प्रयत्न केला असुन प्रतिवादी नं ३ ते ७ यांनी अगर त्यांचे तर्फे इसमांनी दावा मिळकतीत शिरु नये व तेथे असणा—या वादी नं १ ते ३ यांचे वहिवाटीस हरकत करु नये, असा तुर्तातुर्त ताकिदीचा हुकुम देण्याची विनंती केली.

**४.** अर्ज नि. ०५ च्या मजकुरापुष्टयर्थ वादीने नि. १ मधील मजकूर तसेच नि. ०३ सोबत दाखल केलेली कागदपत्रे विचारात घेण्याची विनंती केली. अर्ज नि. ०५ च्या नोटीसीची रितसर बजावणी होवून सदर अर्जास नि. १७ वर प्रतिवादी नं ३ ते ७ यांनी त्याचे म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादींनी कथन केले की, वादीने दाखल केलेला दावा हा कायदेशीर नसुन प्रतिवादींना मान्य व कबुल नाही. त्याचप्रमाणे दावामिळकतीचे वर्णन व चतु:सिमा चुकीच्या असुन अर्जातील सर्व मजकुर बनावट व रचनात्मक असुन प्रतिवादींना मान्य व कबुल नाही.

**५.** प्रतिवादींचे कथन असे की, प्रतिवादी नं ३ ते ७ यांनी दावा मिळकत हि प्रतिवादी नं १ याचेकडुन खरेदी न करता ती प्रतिवादी नं २ याचेकडुन विकत घ ेतलेली आहे. सदर वादी याने कोणतेही खरेदीखत अभिलेखावर हजर केलेले नाही. या व इतर कारणासाठी वादीचा दावा रदद करण्यात यावा अशी मागणी केली. त्यामुळे वादीचा दावा व प्रस्तुतचा अर्ज रद्द करण्याची विनंती प्रतिवादीने केली आहे.

**६.** दोन्ही पक्षाच्या सविस्तर कथनांच्या अनुशंगाने खालील निष्कर्ष कारणांसह मी पुढीलप्रमाणे नमुद करत आहे.

## कारणमिमांसा

**७.** अभिलेखावरील निशाणी ०३ वरील कागदपत्रांचे अवलोकन करता तसेच दाव्यातील कथने व निशाणी ०५ वरील अर्जातील कथने व त्यावरील विनंतीचे अवलोकन करता, सदर ताकीदीचा अर्ज हा दि.०४/०४/२०१२ रोजी दाखल केला असुन आजतागायत वादीने वरील कथनापुष्टयर्थ अर्जातील मजकुराशिवाय प्रतिवादी क्र ३ ते ७ यांनी हरकत केलेबाबत काहीही अभिलेखावर उपलब्ध केलेले नाही. दाव्याच्या निशाणी ०३ सोबत जोडलेल्या कागदपत्रावरुन सदर मिळकती मध्ये

वादीचा प्रथमदर्शनी हितसंबंध असल्याबाबत वाद नाही. परंतु प्रतिवादींनी ने दावा मिळकती मध्ये हरकत अथवा अडथळा केल्याबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर दाखल केला नसल्याचे दिसुन येते.

८. अर्जाच्या निर्णयासाठी सदर अर्जातील व दाव्यातील प्रथमदर्शनी वस्तु:स्थिती विचारात घेणे गरजेचे असते. वादीने सदर ताकीदीचा अर्ज हा दि.०४/०४/२०१२ रोजी दाखल केला असुन सदर प्रतिवादींनी हरकत अथवा अडथळा केल्याबाबत अर्जातील मजकुराव्यतीरीक्त अभिलेखावर काही दाखल केले नसल्याचे दिसुन येते. सबब, सदरपरिस्थीतीत वादीने तत्कालीन अंतरिम अर्जावर आदेश पारित होण्याच्या दृष्टीने कोणतीही आवश्यक परिस्थीती मांडली नाही. अशावेळेस आजमितीस वादीस निशाणी ०५ वरील आदेशाची आवश्यकता उरली नसल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे सदरच्या तुर्तातुर्त ताकीदीच्या अर्जाविषयी वरील सर्व विवेचनावरुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

| | |
|---|---|
| १) | सदरचा निशाणी ०५ वरील अर्ज हा अभिलेखावर दाखल करुन घेण्यात आला. |
| २) | खर्चाबाबत आदेश नाही. |

(पी.पी.आवटे)

दि.०४/०९/२०१८ २ रे सह.दिवाणी न्यायाधीश भोर,जि. पुणे

शेरा

मी शपथेवर सांगतो की या पी.डी.एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द—न—शब्द सारखा आहे.

लिपीकाचे नाव — योगेश पोपटराव पवार

कोर्टाचे नाव — (आवटे पी. पी.)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भोर

दिनांक — ०४/०९/२०१८.
पीठासीन अधिका—यांनी न्यायनिर्णयावर सही केलेली तारीख— ३०/११/२०१८.
न्यायनिर्णय अपलोड करण्यात आल्याची तारीख— ३०/११/२०१८.